# आधुनिक राजकीय नेतृत्वाच्या जडणघडणीत कृत्रिम बुद्धिमत्तेची(AI) भूमिका

**प्रा. हरीशकुमार या. किनकर**
प्रमुख राज्यशास्त्र विभाग
नबीरा महाविद्यालय काटोल
मोबाईल:-९८६०३६५१६२
ईमेल: harishkumarkinkar10@gmail.com

Crossref DOI - https://doi.org/10.63665/rh.v7i2.125

---

**प्रस्तावना :**

आधुनिक काळ हा अतिशय वेगाने बदलणाऱ्या तंत्रज्ञानासाठी ओळखला जातो. त्यामध्ये अल्पावधीतच नवीन तंत्रज्ञान जुन्याची जागा घेताना दिसून येते. कल्याणकारी राज्यात अनेक लोकोपयोगी उपक्रम अधिकाधिक प्रमाणात कार्यरत केले जात असतात. तंत्रज्ञानात होणारी वाढ व समाजातील मागण्या वाढत्या प्रमाणात असल्यामुळे नेतृत्वाच्या Dimension मध्ये लक्षणीय फरक पडला आहे.[१] अशा स्थितीत जीवनातील सर्व क्षेत्रे यामुळे प्रभावित होताना दिसतात. सामाजिक, राजकीय, प्रशासकीय व आर्थिक अशा सर्व क्षेत्रात वेगाने परिवर्तन होताना दिसते. अशावेळी परंपरागत राजकारणातही अनेक स्थित्यंतरे पाहायला मिळते व राजकारणात नेतृत्वाची भूमिका महत्त्वाची असल्याने आधुनिक काळाशी सुसंगत नेतृत्व निर्माण होणे अगत्याचे ठरते. अशा गतिशील जगात नेतृत्वाला आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडून राजकीय कार्य करावे लागते. या सर्व बाबींचा विचार आधुनिक परीप्रेक्षात करणे व नेतृत्व निर्मितीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेच्या भूमिकेचे विश्लेषण करण्यासाठी, राजकीय नेतृत्व आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांचा सहसंबंध जोडला आहे.

**बीजशब्द :** नेतृत्व,कृत्रिम बुद्धिमत्ता, राजकारण

**लोकशाहीत राजकीय नेतृत्वाचे स्थान :**

लोकशाही ही शासन प्रणाली नसून स्वातंत्र्य, समता, बंधुता ही मूल्य व विविध राजकीय संस्था आणि नागरिक यांच्यामध्ये समन्वय निर्माण करणारी विचारप्रणाली आहे. लोकशाही शासनव्यवस्था निर्माण करून गतिशीलता देण्यामध्ये नेतृत्वाची भूमिका अतिशय महत्त्वाची ठरते. लोकशाही शासनाचे स्वरूप वेगवेगळे असून प्रत्येक प्रकारात नेतृत्वाचे महत्त्व दिसून येते. त्यामुळे लोकशाही शासनात नेतृत्वाची भूमिका व त्यातून व्यवस्थेला आकार देताना नेतृत्वाला जी कार्य करावी लागते त्या कार्याचे स्वरूप आधुनिक राजकीय परिप्रेक्ष्यात बदललेले दिसते. त्यामुळे नवीन नेतृत्वाच्या जडणघडणीत कृत्रिम बुद्धिमत्ता अतिशय महत्त्वपूर्ण ठरते. कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे सरकारी कामकाजातील वेळकाढूपणा व कामाची पुनरावृत्ती या सर्व बाबी स्वयंचलीत करता येते. यासाठी आधुनिक राजकीय नेतृत्वाला कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभावपणे वापर करता यायला पाहिजे. लोकांच्या अभिवृत्तीत व

वर्तनात बदलत्या परिस्थितीस अनुरूप असे परिवर्तन घडवून समाज अभंग राखण्यासाठी नेतृत्वाची गरज असते.[२] बदललेल्या काळासोबत नेतृत्वालासुद्धा काही बाबींचे ज्ञान असणे आवश्यक ठरते त्यामुळे आधुनिक काळात कोणत्याही प्रकारच्या शासनात नेतृत्वाच्या निर्मितीमधील पूर्व अट कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापराच्या योग्यतेशी निगडित आहे.

**राजकीय नेतृत्वाचा धोरण निर्मितीशी संबंध :**

राजकीय नेतृत्वाला मोठ्या प्रमाणात समाज कल्याणाकरिता धोरण निर्मिती करावी लागते. त्यासाठी वेगवेगळया प्रकारच्या माहितीचे संकलन करून कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारे त्याचे विश्लेषण करावे लागते. त्यातून भविष्यकालीन संभाव्य धोक्यांचा अंदाज घेता येतो म्हणून, आधुनिक राजकीय नेतृत्वाच्या निर्मितीमध्ये या सर्व घटकांचा प्रकर्षाने विचार केला जातो. रॉबर्ट के. ग्रीनलीप यांनी 'द सर्व्हन्ट एज लिडर' पुस्तक लिहिलं त्यात ते म्हणतात दूरदृष्टी हा तो सद्गुण आहे जो खऱ्या नेत्याजवळ असतो.[३] धोरण निर्मितीमध्ये आरोग्य, शिक्षण, कृषी, रोजगारनिर्मिती, सेवा इत्यादी क्षेत्रातील धोरण निर्माण करताना माहिती गोळा करावी लागते व त्यावरून योग्य धोरण निर्माण करावे लागते त्या दृष्टीने नेतृत्वाला विविध प्रकारची माहिती तंत्रे व साधने या दृष्टीने प्रशिक्षित असणे ही आधुनिक नेतृत्वासमोरील महत्त्वाची बाब आहे. त्यामुळे कृत्रिम बुद्धिमत्ता व तंत्रज्ञानाच्या साहायाने अनेक बाबी सहज साध्य होतात व वेगवान निर्णय घेण्यासाठी साहाय्यक ठरतात.

**कल्याणकारी योजनांच्या अंमलबजावणीत व सार्वजनिक सेवांच्या वितरणामध्ये नेतृत्वाच्या भूमिकेचे महत्त्व :**

राजकीय नेतृत्वाच्या दृष्टीने सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे लोककल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे व त्यासाठी विविध प्रकारच्या तंत्रज्ञानाचा वापर यादृष्टीने महत्त्वाचा ठरतो. व्यक्ती भिन्नतेमुळे सर्व सरकारी सेवांचे विभिन्नीकरण करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता महत्त्वाची ठरते. तसेच विविध लाभांच्या योजना ज्याद्वारे लाभार्थींपर्यंत योजनांचा लाभ पोहोचतो आहे किंवा नाही हे तपासण्याकरिता आधुनिक राजकीय नेतृत्वाला थेट लाभ हस्तांतरण (DBT), मेट्रोसिटीमधील घनकचरा व्यवस्थापन व ट्रॅफिसंबंधी उपाययोजना करणे व ऊर्जेची बचत करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करणे याही बाबीसंबंधात राजकीय नेतृत्वाला सजग राहावे लागते. त्यासोबतच सुरक्षिततेचा मुद्दासुद्धा आधुनिक काळातील ज्वलंत मुद्दा आहे. त्याच्या सोडवणुकीसाठी सायबर सिक्युरिटी व प्रेडिक्टिव्ह पोलिसीग चा वापर करणे या बाबींमध्येही राजकीय नेतृत्वाचा कस लागतो. तंत्रज्ञानातील बदलामुळे शासन व धोरण निर्धारणात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर अनिवार्यपणे करणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रशासकीय संस्कृतीमध्येही आमूलाग्र बदल होत आहे. जर प्रत्येक नागरिक व धोरण निर्मात्यांनी कायदेशीर चौकट आणि नैतिक नियमावली तयार करून त्याचा प्रभावी वापर केला तर कृत्रिम बुद्धिमत्ता लोकशाहीला अधिक सक्षम बनवण्याचे साधन ठरू शकते. कृत्रिम बुद्धिमत्ता वेळेचे नियोजन सुधारून निसर्गावरचा ताण कमी करणे हा बदल घडवून आणत आहे पण हा बदल हळुवारपणे होत आहे, पण दीर्घकाळासाठी महत्त्वाचा आहे.[४]

**कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरासंबंधी नेतृत्वासमोरील आव्हाने :**

कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे अनेक अवजड कामे कमीत कमी वेळात पूर्ण होताना दिसते. परंतु असे असले तरी त्याचा वापर करताना काही गंभीर समस्याही निर्माण होतात. यामध्ये सर्वात महत्त्वाची समस्या ही मानव संसाधनाच्या उपयोगाशी संबंधित आहे. आज सर्व क्षेत्रात 'ए.आय' मुळे मानवी श्रम बेकार होताना दिसते कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे हजारो लाखो लोकांची उपजीविका प्रभावित होत आहे. त्यामुळे गरिबी, बेकारी, आरोग्याच्या समस्या, गुन्हेगारीप्रवृत्ती मध्ये होणारी वाढ व त्यातून अंतर्गत अशांतता या सर्व समस्या निर्माण होत आहे. या सर्व बाबींचा विचार प्रकर्षाने राजकीय नेतृत्वाला करावा लागतो. त्यामुळे राजकीय नेतृत्वाने या सर्व आव्हानांचा सामना करण्यासाठी पर्यायी उपाययोजना आखणे व राजकीय व्यवस्थेतील उणीवा दूर करणे अगत्याचे आहे.

**मूल्यमापन :**

भारतामध्ये आधुनिकीकरण घडवून आणणे व त्याला विकसित राष्ट्रांमध्ये सहभागी करून घेण्याकरिता कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करणे आज काळाची गरज झालेली आहे. कारण कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे वेळ, पैसा व मानवी श्रमाची बचत होऊन अधिक परिणामकारक अशा रीतीने मानवी संसाधनाचा वापर करता येतो व त्यातून अधिक शाश्वत विकास साध्य करता येतो. आधुनिकीकरणाच्या युगात 'ए.आय' ची भूमिका व महत्त्व अनन्यसाधारण आहे. परंतु त्याच्या संतुलित वापरावर लक्ष देणे व मानवी श्रम आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यामध्ये संतुलन साधने आवश्यक आहे.

**संदर्भ :**

- गर्दे,दि.का.,'लोकप्रशासन तत्त्व आणि तंत्र (प्रथमावृत्ती),'श्री.मंगेश प्रकाशन नागपूर. पृष्ठ क्र. १२५ (१९७६)
- डाखरे,संतोष, 'राजकीय नेतृत्व' (प्रथमावृत्ती), श्री साईनाथ प्रकाशन, भगवाघर कॉमप्लेक्स धरमपेठ, नागपूर पृष्ठ क्र. ४ (२०२५)
- मॅक्सवेल जॉन सी. अनुवाद बोरीकर दिनकर,'लीडरशिपचे रहस्य'(प्रथमावृत्ती), साकेत प्रकाशन, औरंगाबाद पृष्ठ क्र. १५१(२०१३)
- लोकमत १३.जानेवारी, २०२६ (लेखक-अजिंक्य देशमुख) पृष्ठ क्र. ५
- विकिपीडिया
- www.google .com